संचालक फलोत्पादन

कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, कृषिभवन जवळ, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५

दुरध्वनी क्र.०२०-२५५३८३३७ ई-मेल-phytocell@gmail.com

महत्वाचे पत्र (ई-मेलव्दारे) जा.क्र.कृआ/फलो-३/आपयो/२०२२-२३/मा.सू./२०२२/22298

दिनांक-23/०६/२०२२.

प्रति,

विभागीय कृषि सहसंचालक

ठाणे / पुणे / नाशिक / लातूर / अमरावती / नागपूर

**विषय:-** <u>आदिवासी कुटुंबाच्या परसबागेत फळझाडे व भाजीपाला पिकाची लागवड योजना-</u> **सन २०२२-२३ मार्गदर्शक सूचना.**

**संदर्भ:-**कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र.आपयो-२०२२/प्र.क्र.९९/९अे दिनाक-११/०५/२०२२

राज्यातील पालघर, ठाणे, पुणे, अहमदनगर, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगांव, नांदेड, अमरावती, यवतमाळ, गडचिरोली, चंद्रपूर व गोंदिया या १४ जिल्ह्यांमध्ये आदिवासी कुटुंबाच्या परसबागेत फळझाडे व भाजीपाला लागवड योजना राबविण्यास संदर्भीय शासन निर्णयान्वये सन २०२२-२३ करीता प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. योजना अंमलबजावणीच्या मार्गदर्शक सूचना सोबत सहपत्रीत करण्यात येत आहेत.

मार्गदर्शक सूचना व जिल्हानिहाय भौतिक व आर्थिक लक्षांक विभागातील जिल्ह्यांना त्वरीत देण्यात यावा, तसेच योजना प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही तात्काळ सुरु करण्यात यावी.

**सोबत**- वरीलप्रमाणे

(डॉ. कैलास मोते)

संचालक फलोत्पादन

कृषि आयुक्तालय, म.रा. पुणे- ०५

प्रत-

१. मा. **उपसचिव,कृषि व पदुम विभाग,** मंत्रालय विस्तार, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.

२. **संचालक, कृषि प्रक्रिया व नियोजन,** कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५ यांना माहितीसाठी तथा आवश्यक त्या कार्यवाहीस्तव समादराने सादर.

३. **जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,** पालघर, ठाणे, पुणे, अहमदनगर, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगांव, नांदेड, अमरावती, यवतमाळ, गडचिरोली, चंद्रपूर व गोंदिया यांना माहितीसाठी तथा आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषीत.

# आदिवासी कुटुंबाच्या परसबागेत फळझाडे व भाजीपाला पिकाची लागवड योजना

## सन २०२२-२३ मार्गदर्शक सूचना

१. प्रस्तावना-

राज्यातील आदिवासी भागातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने पौष्टीक आहार निर्माण करण्यासाठी आदिवासी कुटुंबाच्या परसबागेत फळझाडे व भाजीपाला लागवड करण्यास प्रोत्साहन देण्याची योजना राज्यात सन २००३-०४ पासून राबविण्यात येत आहे.

राज्यात आदिवासी भागात कुपोषणाचे प्रमाण जास्त असल्याने त्यांचे आहारात जीवनसत्व व इतर आवश्यक पोषक द्रव्ये उपलब्ध होण्याच्या हेतुने या कुपोषित भागासाठी पौष्टीक आहार योजना तयार करण्यात आली आहे. परसबागेत उपयुक्त फळे व भाजीपाल्याचा समावेश करुन आहार अन्नद्रव्याच्या दृष्टीने परिपुर्ण करता येणे शक्य होईल. राज्यातील पालघर, ठाणे, पुणे, अहमदनगर, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगांव, नांदेड, अमरावती, यवतमाळ, गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया या आदिवासी भागातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने पौष्टीक आहार निर्माण करण्यासाठी आदिवासी कुटुंबाच्या घराभोवती असलेल्या परसबागेत विशिष्ट भाजीपाला व फळझाडे निवड करुन लागवड करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी सदर योजनेस शासन निर्णय दि. ११ मे २०२२ अन्वये सन २०२२-२३ मध्ये अर्थसंकल्पीत केलेल्या रु. ३३.०० लाख (रु. तेहतीस लाख फक्त) निधीच्या कार्यक्रमाला प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

२. उद्दिष्ट

आदिवासी कुटुंबाच्या परसबागेत फळझाड व भाजीपाला पिकांची लागवड करण्यासाठी ८४६१ उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. सदर उद्दिष्ट साध्य करण्यासाठी फळझाडे व भाजीपाल्याची कलमे/ रोपे ही शासकिय रोपवाटिका, कृषि विद्यापीठ रोपवाटिका, कृषि विज्ञान केंद्र, त्यानंतर नोंदणीकृत खाजगी रोपवाटीकांमधून पुरविण्यात यावीत. तसेच बियाणे, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ यांचेकडून उपलब्ध करुन घ्यावे. कलमे/ रोपे व बी-बियाणाचा पुरवठा एकूण रु. ३९०/- तरतुदीच्या व क्षेत्राच्या मर्यादेच्या अधीन राहून देण्यात यावा.

३. अ) लाभार्थी निवड-

आदिवासी क्षेत्रातील गावामध्ये ज्या कुपोषणग्रस्त आदिवासी कुटुंबाकडे शेतजमीन किंवा परसबाग उपलब्ध असेल अशा आदिवासी लाभार्थीची सन २०२२-२३ या वर्षी लाभार्थी म्हणून निवड करण्यात यावी. लाभार्थी निवड करतांना ज्या आदिवासी कुटुंबात कुपोषीत बालके असतील अशा आदिवासी कुटुंबाला या योजनेचा प्राधान्याने लाभ देण्यात यावा, मात्र यापूर्वी लाभ घेतलेल्या लाभधारकांना या योजनेचा पुन्हा लाभ देण्यात येऊ नये.

आ) **अर्जदाराची ओळख** - अर्जदाराची ओळख पटविण्याकरीता, तसेच तो खरोखर आदिवासी लाभार्थी आहे, त्याने दिलेले बँक खाते क्रमांक बरोबर आहे हे निश्चित करण्याकरिता लाभार्थ्याने खालीलप्रमाणे कागदपत्रांची स्वयंसाक्षांकित प्रत देणे आवश्यक राहील.

१) आदिवासी लाभार्थ्याने स्वत:चे नावे असलेल्या क्षेत्राचे ७/१२ किंवा ८ अ चे उतारे.

२) आदिवासी लाभार्थ्याने स्वत: रहात असलेल्या घराचे मालकी कागदपत्र व परसबाग असलेबाबतचे स्वयंघोषणापत्र.

३) आदिवासी लाभार्थी अनुसुचित जमाती या प्रवर्गातील असल्याचा प्राधिकृत अधिकाऱ्यानी दिलेली जात प्रमाणपत्राची प्रत.

४) आधारकार्डची प्रत / इतर अर्जदाराची ओळख पटविणारा पुरावा.

५) अर्जदाराने त्यांचे बँकेचे खाते आधार क्रमांकाशी जोडून घेणे आवश्यक राहील आणि त्याकरीता त्यांने बँकेला दिलेल्या पत्राची व बँकेकडून मिळालेल्या पोहोच पावतीची प्रत.

आदिवासी कुटुंबामध्ये कुपोषणाचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर असल्याने विशेष बाब म्हणून ज्या जिल्ह्यातील सर्व आदिवासी कुटुंबाला या योजनेचा यापुर्वी लाभ दिलेला आहे, अशा जिल्ह्यांमध्ये ज्या आदिवासी कुटुंबाने या योजनेमध्ये पुर्वी लाभ घेतलेला आहे त्यांना चक्रीय पध्दतीने किमान ५ वर्षाचे कालावधीनंतर पुनश्च: लाभ देण्यात यावा.

**४. फळझाडे / भाजीपाला -**

या कार्यक्रमांतर्गत १) चिकू २) आंबा ३) पेरु ४) दोडका ५) गवार ६) मेथी ७) पालक ८) दुधी भोपळा चा मागणीनुसार इतर भाजीपाला जसे आळू, वांगी इ. स्थानिक गरजेनुसार आवश्यक / मागणी असलेली फळझाड ची कलमे/रोपे व भाजीपाला रोपे / बियाणे याचा पुरवठा करण्यात यावा.

**५. लाभ द्यावयाचे साहित्य व सामुग्री पुरवठा -**

लाभार्थीस कलमे/ रोपे तसेच बी-बियाणाचा पुरवठा एकूण रु. ३९०/- तरतुदीच्या मर्यादेत आणि त्याचे परसबागेतील लागवड योग्य असलेल्या क्षेत्र मर्यादेच्या अधिन राहून देण्यात यावा.

**६. अनुदान-**

या योजनेअंतर्गत प्रति आदिवासी कुटुंबांना कमाल रु. ३९०/- एवढा खर्च अपेक्षित आहे. याअंतर्गत आवश्यकतेनुसार फळझाडांची रोपे/कलमे व भाजीपाला बियाणे पुरविण्यात यावीत. लाभाधारकांना फळझाडे व भाजीपाल्याची कलमे/रोपे ही शासकिय रोपवाटीका, विद्यापीठ,कृषि विज्ञान केंद्र येथून खरेदी करावी. जर सदर संस्थांकडे जिल्हयात कलमे/रोपे उपलब्ध नसतील तर नोंदणीकृत खाजगी रोपवाटिकांमधून घेता येतील. यापैकी बियाणे घटकाचा पुरवठा महाबीजकडून उपलब्ध करुन पुरवठा करावा. प्रति लाभार्थी रु. ३९०/- किंमतीची फळझाडे / भाजीपाला बियाणे याची सविस्तर माहिती खालील प्रमाणे आहे. खालील नमुद लागवड साहित्यामध्ये स्थानिक गरजेनुरुप बदल करता येतील. तथापि, प्रति लाभार्थी रक्कम रु. ३९०/- किंमतीच्या फळझाडे व भाजीपाला लागवड साहित्यामध्ये ३ फळझाडे घेणे अनिवार्य राहील.

आदिवासी लाभार्थींना द्यावयाचे लागवड साहित्य

| अ.क्र | फळे/भाजीपाला प्रकार (लागवड साहित्य) | लाभार्थींना द्यावयाची कलमे/रोपे/ बियाणे (संख्या प्रमाण) | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | चिक्कू | १ | ९० |
| २ | आंबा | १ | ८० |
| ३ | पेरु | १ | ६० |
| ४ | दुधी भोपळा | १०० ग्रॅम | ४५ |
| ५ | दोडका | १०० ग्रॅम | ५६ |
| ६ | गवार | १०० ग्रॅम | ३५ |
| ७ | मेथी | १०० ग्रॅम | १२ |
| ८ | पालक | १०० ग्रॅम | १२ |
| | एकूण | | ३९० |

**७. अंमलबजावणी करणारी यंत्रणा-**

सदर कार्यक्रम संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेमार्फत राबविण्यात यावा.

**८. लाभार्थी प्रशिक्षण -**

रोपांची लागवड, जोपासना, फळे काढणी व भाजीपाला यांचे खाद्यपदार्थ तयार करणे इत्यादीबाबत प्रशिक्षण ग्रामस्तरावर देण्यात यावे. प्रशिक्षणासाठी होणारा खर्च आत्मा मधुन करण्यात यावा.

**९. सनियंत्रण व आढावा -**

सबंधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी या योजनेचा गांवनिहाय आढावा घेऊन लागवडी संबंधीचा अहवाल व योजनेचा प्रगती अहवाल विभागीय कृषि सहसंचालक यांचेमार्फत संचालक (फलोत्पादन) यांना सादर करावा.

**१०.योजनेअंतर्गत तपासणी-**

या योजनेतंर्गत लागवड केलेल्या परसबागेतील लागवडीची तपासणी खालील मापदंडानुसार करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| १) | विभागीय कृषि सहसंचालक | ०.५ टक्के |
| २) | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | १ टक्के |
| ३) | उपविभागीय कृषि अधिकारी | २ टक्के |
| ४) | तालुका कृषि अधिकारी | ५ टक्के |
| ५) | मंडल कृषि अधिकारी | २५ टक्के |
| ६) | कृषि पर्यवेक्षक | १०० टक्के |

११ **मुल्यमापन-** या योजनेचे मुल्यमापन दरवर्षीप्रमाणे करण्यात येऊन त्याबाबतचा मुल्यमापन अहवाल खालील प्रमाणे विहित तक्ता क्र-१ ते ४ मध्ये पाठविण्यात यावा.

१२ लाभार्थी अर्जाचा नमुना, स्वयंघोषणापत्र, तपासणी प्रपत्र-१,योजनेच्या भौतिक/आर्थिक लक्ष-साध्याचा अहवाल प्रपत्र-२ व योजनेच्या आर्थिक प्रगतीचा अहवाल प्रपत्र-३ सोबत देण्यात आले आहेत.त्यामध्ये नियमित अहवाल सादर करण्याची जबाबदारी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची राहील.

तक्ता क्रमांक-१

| | | |
|---|---|---|
| १ | लाभार्थीचे नांव | |
| २ | गावाचे नांव | |
| ३ | तालुका | |
| ४ | जिल्हा | |
| ५ | लाभार्थीचे सर्वसाधारण वर्गीकरण | महिला/पुरुष |

तक्ता क्रमांक-२

| **योजनेत सहभागी झाल्याचे वर्ष** | | | |
|---|---|---|---|
| **योजनेअंतर्गत फळझाडे/ भाजीपाला यापैकी कशाचा समावेश होता** (नांवे व संख्या द्यावी) | | | |
| **अ.क्र** | **फळे/भाजीपाला प्रकार (लागवड साहित्य)** | **लाभार्थीना द्यावयाची कलमे/रोपे /बियाणे (संख्या प्रमाण)** | **अंदाजित रक्कम रुपये** |
| १ | चिकू | १ | ९० |
| २ | आंबा | १ | ८० |
| ३ | पेरु | १ | ६० |
| ४ | दुधी भोपळा | १०० ग्रॅम | ४५ |
| ५ | दोडका | १०० ग्रॅम | ५६ |
| ६ | गवार | १०० ग्रॅम | ३५ |
| ७ | मेथी | १०० ग्रॅम | १२ |
| ८ | पालक | १०० ग्रॅम | १२ |
| | **एकूण** | | ३९०/- |

## तक्ता क्रमांक-३

<table>
<tr><td>१</td><td colspan="7">लाभार्थीने लाभ घेतलेले वर्ष</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td>२</td><td colspan="7">लाभार्थीस मिळालेले उत्पादन</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td rowspan="3"></td><td colspan="4">फळपिके</td><td colspan="4">भाजीपाला</td></tr>
<tr><td rowspan="2">फळपिकाचे नांव</td><td colspan="3">उत्पादन (किलो)</td><td rowspan="2">भाजीपाला पिकाचे नांव</td><td colspan="3">उत्पादन (किलो)</td></tr>
<tr><td>स्वत: वापर</td><td>विक्री</td><td>एकूण</td><td>स्वत: वापर</td><td>विक्री</td><td>एकूण</td></tr>
<tr><td>१</td><td>चिकू</td><td></td><td></td><td></td><td>१)दुधी भोपळा</td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>२</td><td>आंबा</td><td></td><td></td><td></td><td>२)दोडका</td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>३</td><td>पेरु</td><td></td><td></td><td></td><td>३)गवार</td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td rowspan="2"></td><td rowspan="2"></td><td rowspan="2"></td><td rowspan="2"></td><td rowspan="2"></td><td>४)मेथी</td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>५)पालक</td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td colspan="9">इतर भाजीपाला जसे आळू, वांगी इ. त्याचप्रमाणे स्थानिक गरजेनुसार आवश्यक / मागणी असलेली फळझाडे यांची कलमे/रोपे तसेच भाजीपाला रोपे / बियाणे</td></tr>
<tr><td></td><td>एकूण</td><td></td><td></td><td></td><td>एकूण</td><td></td><td></td><td></td></tr>
</table>

## तक्ता क्रमांक-४

| | | |
|---|---|---|
| १ | योजनेबाबत लाभार्थीचे अभिप्राय | |
| २ | क्षेत्रिय अधिकारी / कर्मचारी यांचे अभिप्राय | |
| ३ | क्षेत्रिय अधिकारी / कर्मचारी यांचे नांव, हुद्दा व सही | |

## गोषवारा पत्रक

| अ. क्र. | गावाचे नांव | तालुका | लाभार्थी संख्या | यशस्वी लाभार्थी संख्या | अयशस्वी लाभार्थी संख्या | पुरविण्यात आलेल्या कलमा / रोपांची संख्या | पुरविण्यात आलेल्या निविष्ठा / किलो ग्रॅम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

# अर्जाचा नमुना

## आदिवासी कुटुंबाच्या परसबागेत फळझाडे व भाजीपाला पिकाची लागवड योजना सन २०२२ -२३

१. अर्जदाराचे नाव -

२. गावाचे नाव -

३. तालुका -

४. जिल्हा -

५. संपर्क क्र. -

६. आधार क्र. -

७. अर्जदाराचे सर्वसाधारण वर्गीकरण - महिला/पुरुष

८. सर्व्हे नं-

९. क्षेत्र -

१०.यापूर्वी लाभ घेतलेला असल्यास त्याचा तपशील द्यावा.

अ) लागवड वर्ष -

आ) लागवड केलेल्या फळझाडांची नावे -

इ) सध्या जिवंत असलेल्या फळझाडांची नावे-

११.अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे-

अ) ७/१२ ,८अ

आ) घराचे मालकी कागदपत्र

इ) अनुसुचित जमाती प्रवर्गातील असलेबाबतचे प्रमाणपत्र

ई) आधारकार्ड झेरॉक्स/इतर ओळखीचा पुरावा

उ) स्वयंघोषणापत्र

१२.सन २०२२-२३ साठी योजनेमध्ये नि वड झाल्यास शासन सुचनेप्रमाणे फळझाडे/भाजीपाला परसबागेत लागवड करुन झाडाचे स्वखर्चाने संगोपन करण्याची जबाबदारी माझी राहील.

स्वाक्षरी -

अर्जदाराचे नाव -

# स्वयंघोषणापत्र

मी श्री./श्रीमती ------------------------------------------------ रा. ----------------------

ता.-------------------येथील रहीवासी असून माझ्या नावाचे घराचे मालकी कागदपत्र सादर केले आहे.माझ्या घराजवळ **आदिवासी कुटुंबाच्या परसबागेत फळझाडे व भाजीपाला पिकाची लागवड योजना सन २०२२-२३ अंतर्गत लाभ घेणेकरीता** परसबाग उपलब्ध आहे.

ठिकाण -

दिनांक -

आपला/आपली विश्वासू

नाव -

# तपासणी प्रपत्र- १

१. लाभार्थीचे नाव -

२. गावाचे नाव -

३. तालुका -

४. जिल्हा -

५. संपर्क क्र.

६. लाभार्थीचे सर्वसाधारण वर्गीकरण - महिला/पुरुष

७. सर्व्हे नं-

८. क्षेत्र -

९. लागवड केलेल्या फळ झाडे व भाजीपाला यांचा तपशील-

| अ. क्र | लागवड केलेल्या फळझाडे कलमे/रोपे नाव | तपासणी वेळची सध्यस्थिती | अ.क्र | लागवड केलेल्या भाजीपाला नाव | तपासणी वेळची सध्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| १ | चिकू | | १ | दुधी भोपळा | |
| २ | आंबा | | २ | दोडका | |
| ३ | पेरु | | ३ | गवार | |
| | | | ४ | मेथी | |
| | | | ५ | पालक | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

१०.तपासणी अधिकारी नाव व पदनाम -

११. तपासणी दिनांक -

स्वाक्षरी-

तपासणी अधिकारी नाव -

पदनाम -

प्रपत्र - २

योजनेच्या भौतिक/आर्थिक लक्ष/साध्याचा अहवाल

<u>आदिवासी कुटुंबाच्या परसबागेत फळझाडे व भाजीपाला लागवड योजना सन २०२२-२३</u>

माहे ---------------

(भौतिक - लाभार्थी संख्या व आर्थिक-रु. लाख)

| अ.क्र. | जिल्हा व विभाग | फळझाडांची रोपे/कलमे व भाजीपाला बियाणे | | | | एकुण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भौतिक | | आर्थिक | | भौतिक | | आर्थिक | |
| | | लक्ष | साध्य | लक्ष | साध्य | लक्ष | साध्य | लक्ष | साध्य |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | एकुण | | | | | | | | |

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी

जिल्हा -----------

प्रपत्र-३

# योजनेच्या आर्थिक प्रगतीचा अहवाल

## आदिवासी कुटुंबाच्या परसबागेत फळझाडे व भाजीपाला लागवड योजना सन २०२२-२३

लेखाशीर्ष-मागणी क्र. टी-५, २४०१ - पीक संवर्धन, (७९६) जनजाती क्षेत्र उपाययोजना, ०१) (३२) आदिवासी जिल्हयात परसबाग योजना

माहे ---------------अखेर (रु. लाख)

| अ. क्र | जिल्हा व विभाग | मंजूर निधी | | | वितरीत निधी | | | खर्च | | | मंजूर निधीशी वितरीत निधीची टक्केवारी | वितरीत निधीशी खर्चाची टक्केवारी | समर्पित निधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | केंद्र | राज्य | एकुण | केंद्र | राज्य | एकुण | केंद्र | राज्य | एकुण | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| एकुण | | | | | | | | | | | | | | |

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी

जिल्हा -----------

## १३ आहरण व संवितरण अधिकारी-

या कार्यक्रमासाठी संचालक फलोत्पादन यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करुन आयुक्तालय स्तरावरील खर्चासाठी सहाय्यक संचालक, लेखा १ यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून तसेच विभागीय कृषी सहसंचालक स्तरावर विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयातील लेखाधिकारी, जिल्हा स्तरावर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, उपविभाग स्तरावर, उपविभागीय कृषी अधिकारी व तालुका स्तरावर, तालुका कृषी अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करणेत येत आहे.

## १४ अनुदान लेखाशिर्ष

या योजनेतंर्गत होणारा खर्च रु. ३३.०० लाख (अक्षरी रु. तेहतीस लक्ष फक्त) सन २०२२-२३ या वर्षाकरिता मंजूर व अर्थसंकल्पीत केलेल्या निधीच्या मर्यादेत म्हणजेच रु. ३३.०० लाख तरतुदीनुसार खालील लेखाशिर्षातून भागविण्यात यावा.

**मागणी क्र. टी-५, २४०१ - पीक संवर्धन**
**(७९६) जनजाती क्षेत्र उपाययोजना**
**(०१) (३२) आदिवासी जिल्हयात परसबाग योजना**
**(२४०१ A-८०६) ३३ अर्थसहाय्य**

## १५ मंजूर कार्यक्रम-

या योजनेतंर्गत राबवावयाच्या जिल्हा निहाय कार्यक्रमाचे प्रपत्र-४ सोबत सहपत्रित करणेत येत आहे. तसेच आदिवासी जिल्हयामधील तालुक्यांची यादी प्रपत्र-५ मध्ये सहपत्रित करणेत येत आहे. त्याप्रमाणे योजना राबविणेबाबत तात्काळ कार्यवाही करणेत यावी.

प्रपत्र-४

# आदिवासी कुटुंबाच्या परसबागेत फळझाडे व भाजीपाला पिकाची लागवड योजना

## सन २०२२-२३

## बीडीएसद्वारे वितरीत करावयाचे अनुदान तपशील

| अ.क्र. | जिल्हा | लाभार्थी संख्या | खर्च प्रमाणक | एकूण लागणारी आर्थिक तरतूद (रु. लाखात) |
|---|---|---|---|---|
| १ | पालघर | ८०७ | रु. ३९०/- प्रमाणे प्रति लाभार्थी खर्च | ३.१४७३० |
| २ | ठाणे | २२४ | | ०.८७३६० |
| ३ | पुणे | ४८० | | १.८७२०० |
| ४ | अहमदनगर | ६११ | | २.३८२९० |
| ५ | नाशिक | १५१२ | | ५.८९६८० |
| ६ | धुळे | ६०५ | | २.३५९५० |
| ७ | नंदुरबार | १०७८ | | ४.२०४२० |
| ८ | जळगांव | १६४ | | ०.६३९६० |
| ९ | नांदेड | ४७५ | | १.८५२५० |
| १० | अमरावती | ३८८ | | १.५१३२० |
| ११ | यवतमाळ | ५६८ | | २.२१५२० |
| १२ | गडचिरोली | ६०३ | | २.३५१७० |
| १३ | चंद्रपूर | ५२७ | | २.०५५३० |
| १४ | गोंदिया | ४१९ | | १.६३४१० |
| | **एकूण** | **८४६१** | | **३२.९९७९०** |

प्रपत्र-५

आदिवासी उपयोजनेअंतर्गत जिल्हानिहाय तालुक्यांची माहिती

| अ.क्र | जिल्हा | उपाययोजनेतंर्गत समाविष्ट तालुके |
|---|---|---|
| १ | ठाणे | १) शहापूर, २) भिवंडी, ३) मुरबाड |
| २ | पालघर | १) डहाणू, २) तलासरी, ३) पालघर, ४) वसई, ५) मोरवाडा, ६) जव्हार, ७) वाडा, ८) विक्रमगड |
| ३ | पुणे | १) जुन्नर, २) आंबेगाव |
| ४ | नाशिक | १) कळवण, २) सुरगाणा, ३) बागलाण, ४) पेठ, ५) दिंडोरी ६) इगतपुरी, ७) नाशिक, ८) त्र्यंबकेश्वर |
| ५ | धुळे | १) साक्री, २) शिरपूर |
| ६ | नंदुरबार | १) तळोदा, २) अक्राणी (धडगांव), ३) अक्कलकुवा, ४) नवापूर ५) शहादा, ६) नंदुरबार |
| ७ | जळगांव | १) चोपडा, २) यावल, ३) रावेर |
| ८ | अहमदनगर | अकोले |
| ९ | नांदेड | किनवट |
| १० | यवतमाळ | १) मारेगाव, २) यवतमाळ, ३) बाभुळगाव, ४) कळंब, ५) राळेगांव ६) केळापूर, ७) घाटंजी, ८) पुसद, ९) महागाव, १०) उमरखेड |
| ११ | गडचिरोली | १) सिरोंचा, २) अहेरी, ३) एटापल्ली, ४) धानोरा, ५) कुरखेडा ६) गडचिरोली, ७) आरमोरी, ८) चार्मोशी |
| १२ | चंद्रपूर | १) राजूरा, २) गोदपिंपरी, ३) मूळ, ४) चंद्रपूर, ५) नागभिड ६) शिदेवाही, ७) ब्रम्हपुरी, ८) चिमूर, ९) वरोरा, १०) भद्रावती |
| १३ | अमरावती | १) धारणी, २) चिखलदरा |
| १४ | गोंदिया | १) गोंदिया, २) गोरेगांव, ३)तिरोडा, ४) अर्जुनी/मोर, ५)देवरी ६) आमगांव, ७) सालेकसा, ८) सडक अर्जुनी |

**टिप :** उपरोक्त तालुक्याव्यतिरिक्त नवीन तालुक्यांचा आदिवासी विभागामार्फत समावेश झालेला असल्यास त्या तालुक्यामध्येही ही योजना राबविण्यात यावी.

(डॉ. कैलास मोते)
संचालक फलोत्पादन
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे- ४११००५